# द महाराजा सयाजीराव युनिवर्सिटी ऑफ बरोडा

## वडोदरा, गुजरात, भारत

## कला विद्याशाखा

## मराठी विभाग

## पीएच्.डी. अंतिम गोषवारा

## विषय

# मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांचा तुलनात्मक अभ्यास


**अभ्यासक**

**श्री. चिन्मय मधू घैसास**

**मार्गदर्शक**

**प्रोफेसर डॉ. संजयकुमार करंदीकर**

१. नाटक : संकल्पना, स्वरूप आणि व्याप्ती :

नाटक हा मानवी संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग आहे. पंचम वेद म्हणून नाटकाची आपल्याला ओळख आहे. आपल्या देशाच्या वेगवेगळ्या प्रांतांत नाट्य सादरीकरणाची प्रथा आपल्याला पहायला मिळते. वेगवेगळ्या भाषांतून, वेगवेगळ्या स्वरूपांत नाटके सादर होतात. उदा. उत्तरेस रामलीला, दक्षिणेत यक्षगान, कोकणात दशावतारी नाटके इ. असे वेगवेगळे प्रकार आहेत. निखळ मनोरंजनाबरोबरच लोकांचे प्रबोधन व्हावे आणि त्याद्वारे समाजाची विविधांगी प्रगती व्हावी ह्या दृष्टीने नाटकांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे.

भरतमुनींनी आपल्या नाट्यशास्त्र ग्रंथात नाट्यकलेसंदर्भातील विविध आयाम सैद्धांतिक पद्धतीने मांडले आहेत. कालांतराने, वेगवेगळ्या संस्कृतींच्या आणि भाषांच्या परिचयाने त्यात महत्त्वाचे बदल आणि भर पडत गेली आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे अनेक अनुल्लेखित विषय भारतीय भाषांतील नाटकांत येऊ लागले. आरंभकाळी प्रामुख्याने पौराणिक कथानकावर भर असणारे नाटक कालानुरूप सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक कथावस्तूंकडे लक्ष देऊ लागले.

मराठी नाटकाचा इतिहास तंजावरच्या मराठी शासकांच्या काळापर्यंत जाऊन पोचतो. महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, गुजरात यासारख्या राज्यांत मराठी नाटकाची परंपरा दिसते. या प्रदेशांतील भाषिक-सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय परिस्थिती वेगवेगळी आहे. त्यानुसार त्यात अनेक साम्य-भेददेखील दिसतात. मराठी भाषेच्या जोडीलाच त्या-त्या प्रदेशांतील भाषांतूनही नाट्य सादरीकरणाचे नमुने पहायला मिळतात. त्या-त्या नाट्यकलाप्रकारांचा स्वत:चा असा स्वतंत्र इतिहास आणि स्वत:ची अशी वेगळी वाटचाल आहे. तरीही भौगोलिक जवळीक, सांस्कृतिक अनुबंध, राजकीय साम्य यांच्यामुळे यातील काही प्रकारांत अनेकविध साम्यभेद दिसून येतात.

संत ज्ञानेश्वरांच्या काळात कळसूत्री बाहुल्यांचा उल्लेख असल्याचे आढळते परंतु त्यामागे आध्यात्मिकतेचाच व्यापक अर्थ असल्याचे जाणवते. संत नामदेव, संत तुकाराम आणि इतर संतांच्या काव्यात नाटक या संकल्पनेचा संदर्भ दिसत नाही. नाटक हे समाजात नव्हतेच त्यामुळे ते वाङ्मयात प्रतिबिंबित झाले नाही असेच म्हणावे लागेल. संत एकनाथांनी भारूड या कलाप्रकाराद्वारे लोकांचे प्रबोधन केले परंतु त्यातही आध्यात्माचेच अंग अधिक दिसते. समर्थ रामदास स्वामी आपल्या काही शिष्यांसोबत नाटकाला गेल्याची दंतकथा ऐकायला मिळते परंतु त्याचे

तपशील सापडत नाहीत. मराठी संतकवींना नाटक हा शब्द संस्कृत नाट्यवाङ्मयावरून ज्ञात झाला असावा असे मत वि. भा. देशपांडे मांडतात.

नाटक हा साहित्यप्रकार मानावा की कलाप्रकार ? यावर आजवर बरीच चर्चा झालेली आहे. नाटक हा एक प्रकारचा खेळ आहे आणि त्याला साहित्यमूल्य असलेच पाहिजे असे नाही असे मानत असत. परंतु, 'खेळाची संहिता म्हणजेच त्याचा खरा आधार आहे' हे वि. भा. देशपांडे यांचे मत या संदर्भात विशेष विचार करण्यासारखे आहे. त्यांच्याच मते, 'हा खेळ कशाच्या आधारे उभा राहिला? या खेळातून कोणती मूलतत्त्वे आपल्या हाती आली?' या प्रश्नांची उत्तरे शोधताना त्यातील साहित्यमूल्य अपेक्षितच आहे. 'नाटकातील साहित्यमूल्य हरवले तर सारेच हरवले' असे विधान वि. वा. शिरवाडकरांनी केले आहे. दुसरीकडे, 'नाटक हा डोळ्यांसाठी केलेला ज्ञानयज्ञ आहे' असे महाकवी कालिदासांनी म्हटले आहे. यावरून, नाटक हा कलाप्रकार असण्याबरोबरच साहित्यप्रकारही आहे हे स्पष्ट होते.

नाटकावर त्या-त्या काळातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक शैक्षणिक, कौटुंबिक, नैतिक अशा वेगवेगळ्या परिस्थितींचा परिणाम होत असतो. ब्रेंडर मॅथ्यूज याने आपल्या 'द स्टडी ऑफ ड्रामा' या ग्रंथात ड्रामा आणि प्ले असा फरक केला आहे. ड्रामा या प्रकाराला साहित्यमूल्य असण्याची नितांत गरज आहे तर दुसरीकडे प्ले या

प्रकारात साहित्यमूल्य  एकवेळ असले तर चालेल असे त्याचे म्हणणे आहे. परंतु या विधानाचा विचार करता असा प्रश्न पुन्हा एकदा उभा राहतो की 'वाङ्मयीन गुणवत्तेशिवाय रंगभूमीवर प्रयोग उभा राहील का?' नाट्यसंहितेला वाङ्मयीन मूल्य कशासाठी हवे? असा प्रश्न आधुनिक काळात विचारला जाताना दिसतो. प्रेक्षकाला काही काळ रमवणे हाच हेतू असावा असे काहींचे मत आहे. नाट्यरचनेत तत्वबोध असावा असे मत भरतमुनींनी मांडले आहे परंतु त्यांच्या या मताशी आपण सहमत असलेच पाहिजे असे वि. भा. देशपांडे म्हणतात.

२. नाटक या सहित्यकलाप्रकाराच्या अभ्यासाची गरज :

नाटकाने खूप मोठ्या प्रमाणात रंजन आणि प्रबोधन केले आहे. त्या-त्या कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक इ. गरजा ओळखून नाटककारांनी नाटकांद्वारे रंजनातून समाजप्रबोधन असा प्रयत्न केलेला दिसतो. जुन्या काळी नाटक हे मनोरंजनाच्या निवडक साधानंपैकी एक महत्त्वाचे साधन असल्याने त्याद्वारे रंजन आणि लोकप्रबोधन देखील प्रभावीपणे करता येऊ शकत होते. आरंभीच्या काळात नाटकातील कथानके पौराणिक स्वरूपाची असल्याने त्यातील पात्रे लोकांसाठी वंदनीय आणि आदरणीय असत. त्या पात्रांच्या आधारे उत्तमोत्तम पद्धती, मूल्ये आणि

संस्कार यांची रुजवण समाजात करण्याचे प्रभावी साधन म्हणून नाटकाचा उपयोग झाला. आजही सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय विषयांवर आधारित नाटकांद्वारे समाजाचे प्रबोधन, मतपरिवर्तन, मूल्यवर्धन मोठ्या प्रमाणात करता येऊ शकते.

इतिहासातील वेगवेगळ्या कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक परिस्थितींची आणि एकंदर समाजरचनेची माहिती नाटकांच्या रूपाने मिळत असते. त्या अर्थाने 'नाटक हे साहित्येतिहासाचे एक महत्त्वाचे साधन आहे' असे म्हटल्यास वावगे ठरू नये. काळानुरूप समाजाची बदलत जाणारी अभिरुची आणि नाटक या साहित्यकलाप्रकारात आलेले बदल यांचाही अभ्यास महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र आणि गोवा या दोन्ही राज्यांना नाटक या साहित्यकलाप्रकाराचा फार मोठा वारसा आहे. मराठी रंगभूमीच्या आरंभनिर्मितीचे श्रेय सांगली, गोवा की एलिचपूर हा वाद आजही तितकाच ज्वलंत आहे. त्याविषयीही अधिक संशोधन होण्याची गरज आहे.

३. विषय निवडीमागील भूमिका :

गोवा आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यांमध्ये सामाजिक-धार्मिक-सांस्कृतिक-भाषिक असे अनेक समान दुवे सापडतात. भाद्रपदातील

गणेशचतुर्थी, दसरा यांसारखे सण असो वा महाराष्ट्रातील बोहाडा-आखाडा किंवा खानदेशातील पंचमी-भादवी आणि गोव्यातील पेरणी जागर; धालो, फुगडी, महाराष्ट्रातील खेळे-लळित आणि गोव्यातील रणमाले अशा वेगवेगळ्या कलाप्रकारांमागील भावना आणि भूमिका समान आहे. नाटक या साहित्यकलाप्रकारासंदर्भात देखील दोन्ही राज्यांत खूप साम्य आहे.

मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांचा आरंभ अनुक्रमे १८८४ आणि १८९२ या वर्षी झाला असे मानण्यात येते. गद्य वा अन्य प्रकारच्या मराठी नाटकांपेक्षा संगीत नाटक हे आपल्या सांगीतिक अंगामुळे वेगळे ठरते. तियात्रातही संगीताचा वापर अतिशय प्रभावीपणे झालेला आहे. संगीताबरोबरच या दोन्हींमधील कथावस्तू, आकृतिबंध, शैली या पातळ्यांवर वेगवेगळ्या साम्यभेदांचा अभ्यास करणे हा या अभ्यासामागील हेतू आहे.

४. संशोधनामागील उद्दिष्टे :

अ. मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांच्या इतिहासाचा अभ्यास करणे

आ. मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांच्या साहित्यिक-सामाजिक-सांस्कृतिक-वैचारिक-राजकीय योगदानाच्या अस्तित्व आणि अभावाचा तुलनात्मक अभ्यास करणे

इ. मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांच्या पूर्वसुरींचा अभ्यास करून त्यांत काही साम्यभेद आढळते का याचा शोध घेणे.

ई. आशय, आकृतिबंध आणि सादरीकरण या पातळ्यांवर मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांच्यातील साम्यभेदांचा शोध घेणे.

उ. मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांच्यात काळानुरूप झालेला बदल (आशय, संहिता, भाषा, आकृतिबंध, नेपथ्य, पार्श्वसंगीत, वेशभूषा, रंगभूषा, प्रकाशयोजना इ. च्या अंगाने) तसेच दोहोंच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

ए. ऑपेरा या कलाप्रकाराचा मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र या दोहोंवर प्रभाव आहे या मताचा अभ्यास करणे.

५. संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनामध्ये मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांच्यातील महत्त्वाच्या साम्यभेदांचा अभ्यास केला जाणार आहे. मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांच्या प्रेरणा, कथानके, शैली, सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय-धार्मिक-भाषिक प्रभाव, काळानुरूप झालेले बदल यांचा अभ्यास या संशोधनाच्या माध्यमातून केला जाणार आहे.

## ६. संशोधनाची मर्यादा :

महाराष्ट्र आणि गोवा या प्रदेशांतील मराठी संगीत नाटके आणि कोंकणी तियात्र यांचा अभ्यास या संशोधनांतर्गत करण्यात येणार आहे. आशय, सादरीकरण तसेच सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय-धार्मिक-भाषिक प्रभाव या अंगाने मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

संगीताचा अंतर्भाव असलेल्या लोककलाप्रकारांचा अभ्यास इथे केला जाणार नाही. मराठी संगीत नाटकांची परंपरा १८८४ साली तर कोंकणी तियात्रांची सुरुवात १८९२ साली झाली. २००७ साली रंगभूमीवर सादर झालेले मीना नेरूरकर लिखित 'अवघा रंग एकचि झाला' हे अलिकडच्या कालातील शेवटचे मराठी संगीत नाटक आहे. त्या अनुषंगाने २००७ साल हे संशोधनाच्या दृष्टीने अखेरचे वर्ष मानून तिथपर्यंत दोन्ही साहित्यकलाप्रकारांची झालेली वाटचाल अभ्यासली जाणार आहे ही या विषयाची मर्यादा निश्चित केली आहे.

शास्त्रीय संगीताच्या आधारावर बांधली गेलेली नाट्यपदे अंतर्भूत असलेली निवडक संगीत नाटकेच या संशोधनांतर्गत अभ्यासली जाणार आहेत. भावगीत वा सुगम संगीताचा अंतर्भाव असलेली नाटके या

अभ्यासासाठी लक्षात घेतली जाणार नाहीत ही या संशोधनाची मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे.

७. संशोधनपद्धती :

मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांचा अभ्यास तुलनात्मक पद्धतीने करण्यात येणार आहे. त्यासाठी तौलनिक अभ्यास पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

८. संशोधनपूर्व संशोधन :

मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र या दोन्ही विषयांवर स्वतंत्रपणे अभ्यास याआधी झालेला आहे. परंतु दोन्हींवर एकत्रितपणे तुलनात्मक अभ्यास याआधी झालेला नाही. त्यामुळे मी या विषयावर संशोधन करण्याचा प्रयत्न करणार आहे.

मराठी संगीत नाटकासंदर्भात आजवर अनेकांनी अभ्यास आणि संशोधन केलेले आहे. नाट्याभ्यासक वि. भा. देशपांडे, डॉ. माया सरदेसाई, मकरंद साठे, डॉ. अशोक रानडे, बाळ सामंत इ. यांनी मराठी संगीत नाटकांच्या संदर्भात महत्त्वाचा अभ्यास केलेला आहे.

डॉ. वि. भा देशपांडे यांनी 'मराठी नाटक - नाटककार : काळ आणि कर्तृत्व' या तीन खंडांच्या ग्रंथात मराठी नाटकासंदर्भात महत्त्वाचे विवेचन केले आहे. नाटक या साहित्यकलाप्रकाराच्या वाटचालीसोबतच नाटककारांचे कार्य आणि कर्तृत्व यांच्याविषयीचे संशोधन या ग्रंथात आहे.

'भारतीय रंगभूमीची परंपरा' या ग्रंथात डॉ. माया सरदेसाई मराठी नाटकांच्या इतिहास, परस्परसंबंध तसेच अन्य घटकांविषयी विवेचन केले आहे.

'लोकसंस्कृती : बंध-अनुबंध' या ग्रंथात डॉ. द. ता. भोसले यांनी गोवा आणि महाराष्ट्र यांच्यातील संस्कृतीत असलेले साम्यभेद दर्शविले आहेत.

'लोकरंगभूमी : परंपरा, स्वरूप आणि भवितव्य' या ग्रंथात डॉ. प्रभाकर मांडे यांनी लोकरंगभूमीवरील वेगवेगळ्या प्रकारांविषयी महत्त्वाचे संशोधन आणि विवेचन केले आहे.

'संस्कृतीच्या गुढ्यापताका' या ग्रंथात डॉ. पांडुरंग फळदेसाई यांनी विविध लोककलांचा अभ्यास करून नाट्यप्रकारासंदर्भातही संशोधन केले आहे.

मराठी संगीत नाटक आणि ऑपेराचा संबंध 'संगीत संगती' या ग्रंथात डॉ. अशोक रानडे यांनी अभ्यासला आहे.

'असा बालगंधर्व' या चरित्र ग्रंथात अभिराम भडकमकर यांनी तत्कालीन नाट्यसृष्टीसंदर्भात महत्त्वाची माहिती दिली आहे.

बाळ सामंत लिखित 'मराठी नाट्यसंगीत' या ग्रंथात संगीत नाटकांतील नाट्यपदांचे संकलन करण्याबरोबरच संगीत नाटकांच्या इतिहासाविषयी विवेचन केले आहे.

कोंकणी तियात्रावरचे संशोधन त्या मानाने उण्या प्रमाणात झाले आहे. कोंकणी तियात्रांच्या संहितांची अनुपलब्धता तसेच एखाद्या तियात्राचे मोजकेच प्रयोग सादर करणे हे प्रकार त्यामागील महत्त्वाचे कारण असू शकते. परंतु, गोवा तियात्र अकादमी, गोवा कला अकादमी, गोवा कोंकणी अकादमी यांसारख्या संस्थांनी तसेच अनेक व्यक्तींनी तियात्रासंदर्भात महत्त्वाचे कार्य केलेले आहे.

प्रकाश थळी यांनी 'तियात्राचो इतिहास' या ग्रंथात १८९२ ते १९९२ या शंभर वर्षांच्या काळातील तियात्राच्या वाटचालीचा वेध घेतलेला आहे. कोंकणी तियात्राचा इतिहास, त्याच्या प्रेरणा, आशय, आकृतिबंध आणि महत्त्वाच्या व्यक्ती यांचा अभ्यास त्यांनी या ग्रंथात केलेला आहे.

प्रमोद काळे यांनी 'Tiatr : Expression of Live Popular Culture' हा शोधनिबंध लिहिला आहे.

डॉ. कॉज्मा फर्नांडिस यांनी गोवा विद्यापीठात 'तियात्रांत दिसपी गोंयच्या समाजाचें चित्रण' या विषयावर कोंकणीतील पीएच्.डी. शोधप्रबंध गोवा विद्यापीठात सादर केला आहे.

गोवा विद्यापीठाच्या इंग्रजी विभागाचे प्रा. आंद्रे राफाएल फर्नांडिस यांनी 'Tiatr : Its Development and Scope for Study, Andre Rafael Fernandes' आणि 'Tiatr' हे शोधप्रबंध सादर केलेले आहेत.

डॉ. तन्वी कामत बांबोळकर यांनी 'Folk Theatre in Goa : A Critical Study of Select Forms' या पीएच्.डी. शोधप्रबंधात कोंकणी तियात्र आणि जागोर या लोककलाप्रकारांच्या संबंधांविषयी संशोधन केले आहे.

गोवा तियात्र अकादमी, गोवा कला अकादमी, गोवा सरकारचे कला आणि संस्कृती संचालनालय, दाल्गाद कोंकणी अकादमी तसेच अन्य काही स्थानिक संस्थांनी तियात्रासंदर्भात महत्त्वाचे ग्रंथ प्रकाशित केलेले आहेत.

तियात्राच्या संदर्भात, उपरोल्लेखित ग्रंथ आणि शोधप्रबंध इंग्रजी आणि कोंकणी भाषेतून सादर झालेले आहेत हे इथे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर, त्यांतील संशोधन हे फक्त तियात्राच्या इतिहास किंवा एखाद्या आयामापुरतेच मर्यादित आहे.

'मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांचा तुलनात्मक अभ्यास' हा माझ्या संशोधनाचा विषय आहे. उपरोक्त संशोधकांनी केलेल्या अभ्यासापेक्षा तो वेगळा आहे.

९. संशोधनाची कार्यपद्धती :

अ. मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्रासंदर्भातील सैद्धांतिक साहित्याचे संकलन करणे.

आ. संकलनातील अडचणींची नोंद घेणे आणि त्या अडचणी दूर करणे.

इ. मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांचा विविध अंगांनी तुलनात्मक अभ्यास करणे.

ई. अभ्यासांती निष्कर्षांची मांडणी करणे.

१०. गृहीतके :

अ. तियात्र या साहित्यप्रकाराचा उगम जागोर या लोककलाप्रकारातून झाला.

आ. अन्य नाट्यप्रकारांशी काही प्रमाणात साम्य असूनही तियात्राची धाटणी त्यांच्यापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे.

इ. मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांच्यात आशय आणि सादरीकरणाच्या स्तरावर अनेकार्थी साम्य आहे.

ई. काळाच्या ओघात मराठी संगीत नाटक सांख्यिकदृष्ट्या उणावत गेले परंतु कोंकणी तियात्राने मात्र काळाशी जुळवून घेत महत्त्वाचे बदल केल्याने तियात्र उत्तरोत्तर लोकप्रिय होत गेले.

उ. मराठी संगीत नाटकात पौराणिक-सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय अशा कथाबीजांचा समावेश झाला मात्र कोंकणी तियात्रात सामाजिकतेलाच अधिक प्राधान्य दिले गेले.

ए. मराठी संगीत नाटकांच्या आशय आणि सादरीकरणावर प्रामुख्याने भारतीय परंपरेचा तर कोंकणी तियात्राच्या आशय आणि सादरीकरणावर युरोपियन संस्कृतीचा प्रभाव आहे.

ऐ. मराठी संगीत नाटके राजाश्रयावर तर कोंकणी तियात्र लोकाश्रयावर टिकून उरली आहेत.

११. प्रकरणांची मांडणी :

१. प्रस्तावना

२. प्रकरण पहिले : तौलनिक साहित्याची संकल्पना आणि स्वरूप

३. प्रकरण दुसरे : मराठी संगीत नाटक आणि तियात्र यांचा इतिहास

४. प्रकरण तिसरे : मराठी संगीत नाटक आणि तियात्र यांचे वाङ्मयीन, सामाजिक, वैचारिक कार्य

५. प्रकरण चौथे : मराठी संगीत नाटकांतील निवडक नाटककार आणि कोंकणी तियात्रिस्त

६. प्रकरण पाचवे : मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्रातील साम्यभेद

७. प्रकरण सहावे : मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांची सद्यस्थिती तसेच दोहोंच्या परस्परपूरक सुधारणा/विकासासाठी सूचना

८. उपसंहार (निष्कर्ष)

९. परिशिष्ट

समारोप :

प्रस्तुत संशोधन तुलनात्मक अभ्यासाच्या स्वरूपाचा असल्यामुळे, प्रस्तावात दिलेल्या प्रकरणानुसार, पहिल्या प्रकरणात तौलनिक साहित्याभ्यासाची संकल्पना आणि स्वरूप यांचा अभ्यास मांडला जाणार आहे. दुसऱ्या प्रकरणात, मराठी संगीत नाटक आणि तियात्र यांचा इतिहास अभ्यासला जाणार आहे. तिसऱ्या प्रकरणात, मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांच्या वाङ्मयीन, सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक, राजकीय तसेच रंगमंचीय कार्याचा आणि योगदानाचा अभ्यास केला जाणार आहे. चौथ्या प्रकरणात, मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्राच्या क्षेत्रातील

निवडक व्यक्तींच्या कार्याचा तसेच त्यांच्या कार्यातील साम्यभेदाचा अभ्यास केला जाणार आहे. पाचव्या प्रकरणात, मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांच्या रचनाबंध, विषयवस्तू आणि सादरीकरणाच्या स्तरावरील साम्यभेदांचा अभ्यास केला जाणार आहे. सहाव्या प्रकरणात मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करून दोन्हीही साहित्यकलाप्रकारांच्या तुलनात्मक अभ्यासातून समोर आलेल्या मुद्द्यांच्या आधारे परस्परांना सुधारणेसाठी/विकासासाठी सूचना करण्यात येणार आहेत. तुलनात्मक पद्धतीने मराठी संगीत नाटक आणि कोंकणी तियात्र यांच्या वेगवेगळ्या अंगांचा अभ्यास करून शेवटी निष्कर्ष दिले जाणार आहेत.

संदर्भ :

१. मराठी नाटक - नाटककार : काळ आणि कर्तृत्व खंड १, डॉ. वि. भा. देशपांडे, दिलीपराज प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती : ३१ मे २००८

२. भारतीय रंगभूमीची परंपरा, डॉ. माया सरदेसाई, स्नेहवर्धन प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती : २० मार्च १९९६

३. लोकसंस्कृती : बंध-अनुबंध, डॉ. द. ता. भोसले, पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती : १ जानेवारी २०१०

४. तियात्राचो इतिहास, प्रकाश थळी, गोवा कोंकणी अकादमी, प्रथमावृत्ती : १९९३

५. Tiatr : Its Development and Scope for Study, Andre Rafael Fernandes

६. Tiatr, Andre Rafael Fernandes

७. तियात्रांत दिसपी गोंयच्या समाजाचें चित्रण, डॉ. कॉज्मा फर्नांडीस, पी.एच्.डी. प्रबंध (गोवा विद्यापीठ), २०१६

८. Folk Theatre in Goa : A Critical Study of Select Forms, Dr. Tanvi Kamat Bambolkar, PhD. Thesis (Goa University), January 2018

९. Tiatr : Expression of Live Popular Culture, Pramod Kale, The Transforming of Goa, Norman Dantas (Ed.) (Pg. 137-167), The Other India Press, Mapusa Goa, 1999.

१०. मराठी नाट्यसंगीत, बाळ सामंत, उत्कर्ष प्रकाशन-पुणे, चौथी आवृत्ती : २६ जानेवारी २०११

११. भारतीय संगीत व मराठी नाट्यसंगीताचा संक्षिप्त इतिहास, प्रा. बाबूराव उप्पलवार, विद्याभारती प्रकाशन, १ जून २००६

१२. संगीत संगती, डॉ. अशोक दा. रानडे, राजहंस प्रकाशन-पुणे, पहिली आवृत्ती : ऑक्टोबर २०१४

१३. भारतीय प्रयोगकलांचा परिचय व इतिहास : नाट्य, परिचय - डॉ. राजीव नाईक, इतिहास - डॉ. प्रवीण भोळे, ललित कला केंद्र-पुणे विद्यापीठ, लोकवाङ्मय गृह, पहिली आवृत्ती : ऑगस्ट २०१०

१४. लोकरंगभूमी : परंपरा, स्वरूप आणि भवितव्य, डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन

१५. संस्कृतीच्या गुढ्यापताका, डॉ. पांडुरंग फळदेसाई, मित्रसमाज प्रकाशन

१६. Tiatr Ani Tiatrist, Fausto V Da Costa, The Goan Review Publications, Mumbai, 1994

१७. 100 Years of Konkani Tiatro, Wilmix Wilson Mazarello (Compilation), Directorate of Art & Culture, Panaji, 2000

१८. Tiatr 125th Anniversary, Tomazinho Cardozo (Compilation), Tiatr Academy of Goa, Panaji, 2019

१९. Silver Jubilee of Tiatr, Tomazinho Cardozo (Compilation), Kala Academy, Goa, 2000

२०. असा बालगंधर्व, अभिराम भडकमकर, राजहंस प्रकाशन, प्रथमावृत्ती : १ मे २०१३

२१. संशोधन : स्वरूप आणि समस्या, डॉ. बाळासाहेब गुंजाळ, शब्दालय प्रकाशन, पहिली आवृत्ती : डिसेंबर २०१४

२२. संशोधन पद्धती, डॉ. तरुजा भोसले, साई प्रकाशन-बांदा, प्रथमावृत्ती : २००८

२३. प्रयोगक्षम मराठी नाटके : वर्णनात्मक सूचि (संपादन), डॉ. मु. श्री. कानडे, विदर्भ साहित्य संघ, २१ एप्रिल १९६२